# जागतिकीकरणाच्या परिप्रेक्ष्यात गांधीजींच्या ग्रामपुनर्निर्माण संकल्पनेची प्रासंगिकता

**सपना ज्ञानदेव गावंडे** . रिसर्च स्कॉलर. शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती

---

**प्रास्ताविक:** भारताने आज मुक्त अर्थव्यवस्था स्विकारून २१ वर्षापेक्षाही अधिक काळ उलटून गेला आहे.उद्याच्या भरभराटीचे केलेले वायदे अजून पूर्ण झालेच नाहीत.ज्या उद्याची आपण वाट पाहतो तो उगवण्याची शक्यताही दिसत नाही.परंतु अशा या जागतिकीकरणाच्या परिप्रेक्ष्यात महात्मा गांधींची ग्रामपुनर्निर्माण संकल्पना मात्र प्रासंगिक आहे.भारताने १९९१ मध्ये 'खाऊजा' धोरणाचा स्विकार केला आणि बाजारू अर्थव्यवस्थेला सुरूवात झाली.दळणवळण क्षेत्रात भारताचे दरवाजे जगासाठी व जगाचे दरवाजे भारतासाठी खुली करण्यात आली.या परिप्रेक्षेत केवळ भौतिक विकासाकडे लक्ष केंद्रित केले गेले.त्यातून तुझी-माझी वृत्ती निर्माण झाली.मानव हा एकमेकांपासून दूर जात आहे.खेडी ओस पडू लागली आहे.मानवाचा लोंढा हा शहराकडे ओढवला जात आहे.त्याचा परिणाम शहरीकरणात वाढ होत असून अन्न, वस्त्र, निवारा, बेकारी, दारिद्रय यासारख्या अनेक समस्या भेडसावत आहेत.गांधीजींच्या स्वप्नातील ग्रामीण भारत आज दृष्टिक्षेपात दिसेनासा झाला आहे. भारत हा ७ लाख खेड्यात वसलेला देश आहे.आज मात्र खेड्यांमध्ये वसलेल्या भारतापासून दूर गेलेला इंडिया आपल्याला पाहायला मिळत आहे.म्हणूनच गांधीजींच्या स्वप्नातील भारत पाहायचा असेल तर 'खेड्यांकडे चला' असा संदेश गांधीजींनी १९०९ मध्ये 'हिंद स्वराज्य' या पुस्तकात दिला आहे.

**समस्यासूत्रण:-** महात्मा गांधींना ग्रामपुनर्निर्माण संकल्पना का मांडावी लागली याचा शोध घेणे आवश्यक आहे.ब्रिटीश भारतात येण्यापूर्वी भारतातील ग्रामीण व्यवस्था स्वावलंबी, आत्मनिर्भर होती.खेड्यातील बारा बलुतेदार गावातील सर्व गरजा एकमेकांच्या उद्योग व्यवसायांमार्फत भागवित होती.ग्रामीण भारत हा आत्मनिर्भर, स्वावलंबी व स्वयंपूर्ण होता.तद्‌तच ग्रामीण भारताची दुरावस्था इ.स.१६०० मध्ये इस्ट इंडिया कंपनी भारतात स्थिर झाल्यावर झाली.व्यापाराच्या हेतुने आलेले ब्रिटीश सरकार खेड्यांचे शोषण करू लागले.त्यामुळे खेडी मोडकळीस आली.गांधीजींच्या मते, 'खरा भारत पाहायचा असेल तर खेड्यांकडे चला'.खेड्यांचा विकास म्हणजे भारताचा विकास असा संदेश गांधीजींनी दिला.गांधींनी ग्रामपुनर्निर्माण संकल्पना १९०९ मध्ये लिहिलेल्या 'हिंद स्वराज्य' पुस्तकात प्रस्तुत केली. आधुनिक काळात महात्मा गांधींच्या ग्रामपुनर्निर्माणावर ब्रिटीश राजवटीप्रमाणे जागतिकीकरण धोरणाचाही प्रभाव पडत आहे. भारताने १९९१ मध्ये 'मुक्त अर्थव्यवस्थेचा' स्विकार केला.परंतु या मुक्त अर्थव्यवस्थेने जगासमोरील कुठल्याच समस्या सुटल्या नाहीत, उलट अधिक उग्र रूप धारण करीत आहेत. आधीच मोठ्या प्रमाणातील विषमता, बेरोजगारी, दारिद्र्य, पर्यावरण विनाश इत्यादी समस्या आहेत. त्यातच औद्योगिक क्रांतिनंतर विकसीत झालेल्या केंद्रित उत्पादन पद्धतीत आणि भांडवलशाही अर्थव्यवस्थेमुळे मोठ-मोठे उद्योग उभे राहिले.कच्च्या मालाची व मोठ्या बाजारपेठेची गरज भासू लागली.विकेंद्रीत अर्थव्यवस्थेची जागा केंद्रिकरणाने घेतली.मानवाचे मोठ्या प्रमाणात शोषण होऊ लागले. आज या सर्व समस्यांचे मुळ कारण औद्योगिक क्रांतिनंतर विकसीत झालेली केंद्रित उत्पादन पद्धती आहे. ह्या उत्पादन पद्धतीला पर्याय शोधूनच जागतिकीकरणाचे आव्हान पेलता येणार आहे.गांधीजींच्या आर्थिक विचारातून पुढे आलेली उत्पादन प्रणाली ही वेगळी आहे.गांधीजी ग्रामपुनर्निर्माणात विकेंद्रिकरणावर अधिक भर देतात.ग्रामोद्योगांना अर्थव्यवस्थेच्या केंद्रस्थानी मानतात.या ग्रामोद्योगाच्या व उत्पादनाच्या केंद्रस्थानी ग्रामीण लोकांची गरज निर्माण झाली असते.त्यामुळे खेड्यातील उद्योगातून उत्पादीत माल खपवण्यासाठी जाहिराती, प्रसारमाध्यमांची गरज नाही.खेड्याच्या विकासावर गांधीजी अधिक भर देतात.ग्रामोद्योगातील उत्पादीत माल खेड्यात राहतो त्यामुळे वाहतुक व्यवस्थेवर तान पडणार नाही. नफा कमविणे हा उद्देश नसल्याने उत्पादीत वस्तूचे प्रमाणही मर्यादीत राहील. त्यामुळे नैसर्गिक संपत्तीची लुट थांबेल आणि चंगळवादाला आळा बसेल. प्रदूषण पर्यावरणाचे प्रश्न देखिल भेडसावणार नाहीत. ग्रामोद्योग हे श्रमावर आधारीत असल्याने भांडवलही कमी लागेल व अधिक लोकांना काम मिळेल. खेड्यातच रोजगार मिळाल्याने खेडी ओस पडणे आणि शहरात झोपडपट्टीची वाढ होणे थांबेल व समस्याही सुटेल. महात्मा गांधींनी ग्रामपुनर्निर्माणाकरिता १०० वर्षापूर्वी 'हिंद स्वराज्य' या पुस्तकात जागतिकीकरणावर पर्याय शोधून ठेवले आहे. म्हणून महात्मागांधीप्रणितग्रामपुनर्निर्माणसंकल्पनाप्रासंगिकआहे.

**उद्देश:-**१. जागतिकीकरणाच्या परिप्रेक्ष्यात गांधीप्रणित ग्रामपुनर्निर्माणावरील परिणामांचे अध्ययन करणे.

२. गांधीजींचे ग्रामपुनर्निर्माण कार्यक्रम आजच्या सामाजिक व आर्थिक असुरक्षिततेच्या वातावरणात प्रभावी ठरत आहेत याचे अध्ययन करणे.

३.जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल्या भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे गांधीप्रणित ग्रामीण अर्थव्यवस्थेवरील परिणामाचा शोध घेणे.
४.आधुनिक काळात गांधीप्रणित ग्रामीण भारत-शहरी इंडिया बनत आहे याचा शोध घेणे.

**गृहितक :-**१.जागतिकीकरणाच्या परिप्रेक्ष्येत गांधीजींच्या ग्रामपुनर्निर्माण कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी न झाल्यामुळे खेडी ओस

पडून शहरीकरणात वाढ होत आहे

२.स्वातंत्र्योत्तर काळात गांधीप्रणित कुटीर व लघुउद्योगाकडे दुर्लक्ष करून मोठ्य यंत्रउद्योगाकडे लक्ष केंद्रित केले आहे.
३.आधुनिक भारताच्या उभारणीकरिता गांधीजींच्या ग्रामीण व्यवस्थेचा महत्त्वाचा वाटा असून सुद्धा ग्रामपुनर्निर्माणाची प्रभावी अंमलबजावणी होत नाही.

४.जागतिकीकरणाच्या परिप्रेक्ष्यात गांधीजींचे स्वयंपूर्ण ग्राम हे स्वप्न प्रत्यक्षात येण्यात अनेक अडचणी निर्माण झाल्या आहे

**गांधीजींना अपेक्षित ग्रामपुनर्निर्माण संकल्पना :-** गांधीजींच्या मते हिंदुस्थानातील आदर्श खेड्यांची रचना अशा स्वरूपाची असेल की, जेथे संपूर्ण स्वच्छता ठेवणे सोयीचे होईल. खेड्यातील घरांची रचना योग्य प्रकारची आणि खेळती हवा राहण्यासाठी असेल. घरातील सामान असे वापरलेले असेल की, ते गावाच्या आसपासच्या पंचक्रोशित मिळण्याजोगे असेल. घराच्या पाठीमागे मोकळी जागा असेल. खेड्यातील रस्ते आणि गल्ल्या ह्या धुळीपासून मुक्त असतील आणि त्या सर्वांना वापरता येण्यासारख्या असतील. सभागृह असेल. सहकारी दुध पुरवठा केंद्र असेल. प्राथमिक व दुय्यम शाळा असतील व तेथे औद्योगिक शिक्षणाला मध्यवर्ती स्थान असेल. गावात एक पंचायत असेल व तेथे गाव आपले तंटे मिटवतील. गाव आपले धान्य, भाजीपाला आणि फळे स्वतः पिकवील तसेच आपल्याला लागणाऱ्या वस्त्रासाठी स्वतः खादी तयार करतील. ही महात्मा गांधीजींना अपेक्षित अशी आदर्श गावाची रचना आहे.

**महात्मा गांधींनी स्वातंत्र्यपुर्व काळात ग्रामपुनर्निर्माणाकरिता राबविलेले कृती कार्यक्रम:-**गांधीजींनी स्वातंत्रपुर्व काळात ग्रामपुनर्निर्माणाकरिता १३ कलमी कृती कार्यक्रमाची मांडणी केली होती.या रचनात्मक कार्यक्रमावर गांधी विचारधारा अवलंबून आहे.

**१. ग्रामोद्योग:-** ग्रामपुनर्निर्माणाकरिता ग्रामोद्योगाला महात्मा गांधींनी फार महत्त्व दिले आहे. ब्रिटीशांनी यंत्रावर आधारीत नवे उद्योग सुरू केले होते.त्या उद्योगातून मोठ्या प्रमाणावर वस्तूंचे उत्पादन होऊ लागले, त्यामुळे उद्योगांची पिछेहाट झाली.गांधीजींनी या परिस्थितीचे अवलोकन केले आणि हे स्पष्ट केले की ग्रामोद्योगाशिवाय तरणोपाय नाही.त्यासाठी त्यांनी स्वदेशीचा आग्रह धरला आणि श्रमाची प्रतिष्ठा पटवून दिली.खादी, तेलउद्योग, चांभार काम असे गृहउद्योग चालविले. सर्वांच्या गरजांची पुर्तता होईल, लोकांना काम मिळेल. बेकारी गरीबीचा प्रश्न सुटेल. ग्रामोद्योगातून स्वयंपूर्ण श्रमसंस्था, ग्रामराज्य येईल. ग्रामोद्योगातून मालक-मजूर हे वर्ग राहणार नाहीत. सर्वोदयी समाजाची समानतेच्या आधारावर स्थापना करता येईल. उद्योगाचे विकेंद्रिकरण होईल आणि विकेंद्रिकरणामुळे विषमतेचा आधार नष्ट होईल.

**२. अस्पृश्यता निवारण:-** समाजातील सर्व व्यक्ती समान आहेत तेव्हा त्यांना समान संधी मिळाली पाहिजे ज्यामुळे जन्म या आधारावर प्राप्त होणारी जातीय व्यवस्था आणि अस्पृश्यता त्यांना मुळीच मान्य नव्हती. गांधीजींनी अस्पृश्यतेला भारतीय समाजावरील कलंक म्हटले आहे.त्यांच्या मते 'अस्पृश्यता आणि हिंदू धर्माचा तसा काही संबंध नाही, अस्पृश्यतेचा उदय धर्मातून झालेला नाही तर अहंकारातून झाला आहे. अस्पृश्यता ही समाज उद्भवीत आहेत. त्यामुळे आपण सर्वांना अस्पृश्यता दुर करण्याचा प्रयत्न केल पाहीजे. अस्पृश्यतेच्या प्रयत्नातून समाजाची अपरिमित हानी झाली आहे.' गांधीजींनी अस्पृश्यतेच्या प्रश्नाकडे गांभीर्यपूर्वक लक्ष केंद्रित केले. अस्पृश्यतेचा प्रश्न केवळ राजकीय दृष्टिकोनातून हाताळला नाही, तर त्यांना सामाजिक न्याय अपेक्षित होता. अस्पृश्यता निवारण करण्यासाठी त्यांनी 'हरिजन' वृत्तपत्र चालविले आणि 'हरिजन सेवक' संघाची स्थापना केली.

**३. धार्मिक व जातीय ऐक्य :-** महात्मा गांधीजींनी समाजात सर्वधर्म समभावाचे तत्व स्विकारले आहे. भारत देश हा विविध धर्मात विभागला गेला आहे.परंतु या विविध धर्मानी नटलेल्या या भारतात धर्म वेगवेगळे असले तरी ईश्वर एकच आहे.सर्व धर्माची नैतिक तत्व सारखेच आहे.प्रत्येक धर्मात सत्य, प्रेम, अहिंसा आणि करूणा यांचे महत्त्व पटवून दिले आहे.शांतता आणि न्याय हे सर्व धर्माचे लक्ष आहे.राम-रहिम, कृष्ण-करित ही नावे वेगळी असली तरी ईश्वर एक आहे.वेद, पुराण,बायबल हे ग्रंथ वेगळे असले तरी त्यातील ईश्वरी प्रार्थना सारखीच आहे. अस्पृश्यतेविषयी गांधीजी म्हणतात, सर्वधर्म समान असल्यामुळे धर्मपरिवर्तनाची आवश्यकत नाही.गांधीजींनी हिंदू-मुस्मिल ऐक्यावरसुद्धा भर दिला आहे.त्यांनी जातीय ऐक्याचा पुरस्कार केल. त्यांच्या मते, जाती-भेद अयोग्य आहे. जातीनुसार श्रेष्ठ-कनिष्ठत्व त्यांना मान्य नव्हते. म्हणूनच जाती-जातीत समानता असली पाहीजे असे त्यांनी प्रतिपादन केले आहे.

**४. दारूबंदी :-** 'जन सुधारायचे असेल तर त्याचे मन सुधारले पाहीजे' हा आदर्श ग्रामक्रांतिचा आशय आहे. गांधींनी दारूबंदीवर मार्मिक भाष्य केले.'दारू म्हणजे सर्वनाश' लोकांना राक्षस बनवून शासनाची तिजोरी भक्कम करणे हा शुद्ध अविचार आहे.गांधीजींनी दारूबंदीकरिता सातत्याने प्रयत्न केले.दारूमुळे मानवी शरीराची हानी होते. तो व्यक्ती आपल्या मनावर कोणत्याही प्रकारे नियंत्रण ठेवू शकत नाही म्हणून गांधीजींनी ग्रामपुनर्निर्माणासाठी मद्य निषेधाचा कार्यक्रम हाती घेतला आणि अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस अधिवेशनात दारूबंदीचा ठरावा मान्य करून घेतला. दारूबंदीशिवाय कोणत्याही समाजाचा विकास होऊ शकत नाही म्हणून गांधीप्रणित ग्रामपुनर्निर्माणाकरिता दारूबंदी करणे हे आजच्या काळाची गरज बनली आहे.

**५. खादीचा प्रसार:-** गांधी विचारात श्रमाबरोबर शरीर श्रमाला तसेच स्वदेशीला महत्त्वपूर्ण स्थान दिले. स्वदेशीचा आग्रह त्यांनी धरला.त्यासाठी त्यांनी खादी निर्माण करणे आणि खादीचा प्रसार करणे, लोकांना काम मिळवून देणे हा त्यामागचा उद्देश होता.भारत हा

७ लाख खेड्यात वसलेला देश आहे.खेडूतांचा मुख्य व्यवसाय शेती असल्यामुळे शेतीतून बारमाही उत्पन्न ते मिळवू शकत नव्हते.या शेतीला पुरक उद्योग म्हणून घरच्या घरी सुत कताई आणि खादी विणने यावर गांधींनी ग्रामपुर्ननिर्माण कार्यक्रमात अधिक भर दिल

**६. ग्रामसफाई:-** ग्रामपुर्ननिर्मितीच्या कृती कार्यक्रमात ग्रामसफाईकडे दुर्लक्ष करता येणार नाही. पाच लाख पेक्षा जास्त ग्रामीण समुहात घाणीजे साम्राज्य दिसते, त्यातून रोगराई, मृत्युची वाढती संख्या अपरिहार्य ठरते.हे लक्षात घेऊन गांधीजींनी ग्रामसफाईच्या कार्यक्रमाच्या पुरस्कार केला.गावातील घरे मोकळी म्हणजे सुर्यप्रकाश व खेळती हवा असणारी असावी.घरे मातीची असली तरी चालेल मात्र त्यात निटनेटकेपणा व स्वच्छता असावी.रस्त्यातून सांडपाणी वाहून नेणारे गटारे, शौच खड्डे असावे.केरकचरा टाकण्यासाठी कंपोष्ट खड्डयांचा वापर करावा.पिण्याचे पाणी स्वच्छ असावे.प्रत्येकाने ग्रामसफाईत सहभागी व्हावे. यातून कोणतेही काम कमी प्रतिचे नाही हेही लक्षात येईल. महात्माजी स्वतः ग्रामसफाईला फार महत्त्व देत असत.

**७. नई तालीम:-** महात्मा गांधींनी शिक्षण प्रणालीत आमूलाग्र परिवर्तन झाले पाहिजे असे म्हटले असून त्यासाठी 'नई तालीम' शिक्षण पद्धती स्विकारली आहे. 'नई तालीम' किंवा 'मुलोद्योगी शिक्षण' ही स्वानुभवातून व प्रयोगातून साकार झालेली शिक्षण प्रणाली आहे.त्यात शिक्षण व उद्योग यांचा समन्वय साधला आहे.गांधीजींना वर्गातील बंदीस्त पाठ्यपुस्तकात एकवटलेले शिक्षण नको होते.शिक्षणाने शरीर, बुद्धी व हृदय याचा समतोल विकास झाला पाहिजे.शिक्षण हे साध्य नाही, साधन आहे.यातून चारित्र्य संवर्धन झाले पाहिजे.शिक्षणात मातृभाषा हिंदी, गणित, निसर्ग परिचय, चित्रकला, संगीत, उद्योग यांचा समावेश असावा. इंग्रजी माध्यमावर उगीच भर देऊ नये. कारण त्यामुळे मानसिक शक्तीवर ताण पडतो.'नई तालीम' ही क्रांतिकारी शिक्षणप्रणाली आहे.पुर्ननिर्मितीचे एक माध्यम म्हणून मानले आहे.

**८. प्रौढ शिक्षण:-** स्वातंत्र्यापुर्वी ग्रामीण भागात शिक्षणाच्या सोई नव्हत्या. काही लोक शहरातील शाळा विद्यालयात जाऊन शिक्षण घेत होते.तर सामान्य माणूस शिक्षणापासून वंचित राहत होता.या निरक्षरतेचा फायदा सावकार, व्यापारी घेत होते आणि लोकांचे शोषण करीत असत.हे लक्षात घेऊन महात्मा गांधींनी प्रौढ शिक्षणाचा प्रसार केला.प्रौढ शिक्षण म्हणजे फक्त अक्षरओळख नाही तर ते जीवन शिक्षण असले पाहीजे.त्यात सभोवतालच्या जगाचा परिचय असला पाहिजे.लोकांची जाणिवजागृती झाली पाहीजे.जीवनावश्यक कौशल्याचे शिक्षण मिळाले पाहिजे.म्हणूनच गांधीजींनी ग्रामपुनर्निर्माणात प्रौढ शिक्षण हा कार्यक्रम हाती घेतला होता.

**९. मातृभाषेचा विकास:-** वर्तमानकालीन शिक्षणातून जे दोष निर्माण झाले आहेत त्यासाठी इंग्रजी माध्यम हे एक कारण आहे. इंग्रजी माध्यमातून न समजता आपण शिकतो आणि परीक्षेनंतर विसरून जातो. आमची सारी धडपड इंग्रजी माध्यमावर प्रभुत्त्व मिळविण्यासाठी असते. त्यामुळे आम्ही विचार, चिंतनास पारखे होतो. इंग्रजी शिकण्याचे आम्हाला निःसत्व पुरूषार्थहीन बनविले आहे. त्यासाठी मातृभाषेतून शिक्षण दिले पाहिजे.त्यामुळे विद्यार्थ्यांची शक्ती उगीचच वाया जाणार नाहीत.त्यात कोणत्याही विषयाचे वास्तविक ज्ञान लवकर होऊ शकेल. त्यांच्या विकासात अडथळा निर्माण होणार नाहीत.महात्मा गांधींनी उच्च शिक्षणासाठी सुद्धा मातृभाषा माध्यमाचा पुरस्कार केला आहे.

**१०. आरोग्य सुधारणा:-** गांधीजींच्या ग्रामपुर्ननिर्माण कार्यक्रमात असंख्य पैलूंचा समावेश होता. आरोग्य सुधारणा हा त्यातील रूढ भाग होय. आरोग्य ही यशाची गुरूकिल्ली आहे.त्याशिवाय जीवन संपन्न होऊ शकत नाही. आरोग्या अभावी रोगराई वाढते, अनेक विकार निर्माण होतात. गांधीजींनी आरोग्य सुधारणांबाबत सतत प्रयोग केले त्यात त्यांनी आहार, विहार, व्यायाम, ब्रम्हचर्य, निसर्ग उपचार यावर सतत चिंतन केले. आहारामध्ये मांसाहारापेक्षा त्यांना शाकाहार मान्य होता. आहार साधा व समन्वयिक असावा. त्यांनी उपासावर भर दिला.ब्रम्हचर्य हे व्रत म्हणून संबोधले.त्यांनी ग्रामसफाईवर भर दिला.कारण घाणीतून रोग होतात.ग्रामीण लोकसमुहात साफसफाई, शौच खड्डे, पिण्याच्या पाण्याची सुधारणा, चांगला सुर्यप्रकाश व हवा येणारी घरे असायला पाहिजे.म्हणजेच चांगले आरोग्य राहिल. त्यासाठी त्यांनी ग्रामसफाईला फार महत्त्वाचे स्थान दिले आहे.कुष्ठरोग निर्मुलन कार्य त्यांच्या प्रेरणेने सुरू झाले. आज या कार्याचा व्यापाक वृक्ष झाला आहे.

**११. गोरक्षण:-** हिंदू धर्मात गायीला पुज्यनिय स्थान आहे. हिंदू-मुस्लिमात गोहत्येवरून तणाव निर्माण होतो.तो टाळण्यासाठी गांधीजींनी मुस्लिमांच्या हृदयपरिवर्तनावर भर दिला.गायीला मानवी जीवनात अलौकिक मानले जाते.भारतात गाय ही मानवाची आधार मानली जात होती.ती केवळ दुधच देत नाही तर शेतीचा आधारस्तंभ होती.भारतातील लाखो-करोडो लोकांचे पालन करणारी माता असून ईश्वराच्या मुकसृष्टीचे रक्षण करणारी आहे.मुस्लिम आणि हिंदू यांच्यात गोहत्येवरून तणाव निर्माण होतो तो टाळणे आपले नैतिक कर्तव्य आहे.गांधीजींनी ग्रामपुनर्निर्माण कार्यक्रमात गोरक्षणाला अतिशय महत्त्व दिले होते.गोरक्षण आपली सर्वांची जबाबदारी आहे.तिच्या कातडीपासून चमडा इ.उपयोगामुळे गाय ही समाजाचे भरणपोषण करते असे म्हटले जाते.म्हणूनच तिला गोमाता म्हणतात.प्रत्येकानी मानवतावादी भूमिकेतून गायीच्या संरक्षणाचे कर्तव्य पार पाडले पाहीजे असे गांधीजी मानत असत.

**१२. स्त्री सुधारणा:-** भारतातील स्त्री धर्माच्या चौकटीत बांधली गेली होती. स्त्रीयांवर अनेक बंधने लादली जात होती.पतीच्या निधनानंतर सती जाणे, बालविवाह प्रथा, केशवपण यासारख्या अनिष्ठ प्रथा रूढ होत्या.स्त्रीला स्वतंत्र जीवन जगण्याचे स्वातंत्र्य हिरावून

घेतले होते.स्त्री ही पुरूषाची दासी आहे एवढेच तिचे अस्तित्त्व निर्माण झाले होते.परंतु गांधीजींना हे मान्य नाही.स्त्री आणि पुरूषाने सामाजिक व्यवहारातील निर्णय एकत्र येऊन घेतले परंतु पुरूषाने स्त्रीला मित्र किंवा जीवनसाथी मानन्याऐवजी दासी मानले होते.गांधीजींना हे मान्य नाही.ते 'स्त्री स्वातंत्र्यांचे खंदे पुरस्कर्ते होते.स्त्री व पुरूषांना निसर्गाकडून सर्व क्षमता सारख्याच मिळालेल्या आहेत.बुद्धीच्या बाबतीत स्त्री पुरूषापेक्षा कमी नाही. स्त्रीला स्वतःचे स्वतंत्र अस्तित्त्व असते. तिलाही पुरूषाप्रमाणे सर्व अधिकार हवेत' असे गांधीजी मानत होते.गांधींनी स्त्री सुधारणा हा ग्रामपुनर्निर्माण कार्यक्रमाचा मुल आधार मानला होता.

**१३. आर्थिक समताः-** गांधीजींना सामाजिक, आर्थिक, धार्मिक इ. कोणत्याही क्षेत्रातील विषमता मान्य नव्हती.सर्वोदयी समाज हे त्यांचे ध्येय होते.सर्वोदयी समाजातील सर्वांचे कल्याण हे तत्त्व आर्थिक समतेशिवाय साध्य होणार नाही हे जाणून त्यांनी विश्वस्ताची संकल्पना मांडली.सर्वोदयी समाजातील दारिद्रय गरीबाला अधिक विषम बनविते.म्हणूनच गांधीजी म्हणतात, 'आत्यांतिक दारिद्र्य माणसाला, लाचार, भित्रा, नेभळ बनविते.माणूस म्हणून जगण्यासाठी प्रत्येकाला समतोल आहार, पुरेसा कपडालत्ता, राहण्यासाठी घर, शिक्षण आणि आवश्यक ती वैद्यकीय मदत मिळालीच पाहिजे' असे गांधीजींचे आवर्जुन सांगणे होते.गांधीजींनी सर्व भारतीयांना आपल्या गरजा मर्यादीत ठेवण्यास सांगितले.गांधीजींनी पंचायत राज व्यवस्थेचा सर्वप्रथम पुरस्कार केला. इतकेच नव्हे तर पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातून ग्रामीण जनतेच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक विकास उपरोक्त १३ कलमी कृती कार्यक्रमातून घडवून आणण्याचा प्रयत्न केला.

**निष्कर्षः-**१.गांधीजींचा यंत्रयुगाला विरोध होता. काही आवश्यक उद्योगांशिवाय यंत्रउद्योगाला त्यांनी विरोध केला.यंत्र हे राक्षसी आहेत.त्यामुळे मानवी संस्कृतित कृत्रीमता येते.लोकांना रोजगार मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांनी स्वतः चरखा चालविला. सद्या जागतिकीकरणाच्या युगात यंत्रामुळे बेकारी, दारिद्र्य इत्यादी प्रश्न देशात निर्माण झाले.लोकांच्या जीवनमुल्यात बदल झालेला दिसतो. आज देशात खादी वापरणारे लोक अपवादाने पहावयास मिळतात.यामुळे देशातील पैसा परदेशी जात आहे.तेथील खादी उत्पादन करणारा कामगार उपाशी अवस्थेत जीवन जगत आहे.

२.आज जागतिकीकरणाच्या परिप्रेक्ष्यात भारत तीव्र वेगाने वाढत असलेल्या लोकसंख्येमुळे प्रचंड दारिद्र्य, बेकारी, ग्रामीण व शहरी यांच्या विकासातील वाढती तफावत, बेरोजगारी तसेच कृषिवरील वाढता ताण यासारख्या अडचणींमुळे गांधीजींना अभिप्रेत ग्रामपुनर्निर्माण संकल्पना अद्यापही साध्य झाली नाही.

३.आज शहरीकरणाची ओढ व्यक्तीला लागलेली आहे. त्यामुळे लोक खेड्यात राहायला तयार नाहीत.कारण उच्च शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध नाहीत.काही खेडी ही ओस पडली आहे.स्वातंत्र्याच्या काळात, विजेचा तुटवडा, आरोग्याच्या सुविधा, पिण्याच्या पाण्याची सुविधा ह्या सुविधा आपण ६६ वर्षात पुर्ण करू शकलो नाहीत.परंतु त्या पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

४.उदारीकरण, खाजगीकरण, जागतिकीकरण या धोरणामुळे भारत पारतंत्र्याकडे वाटचाल करत आहे. जगातील अनेक राष्ट्रांवर भारताचे अवलंबन वाढत चाललेले आहे. ही परिस्थिती अशीच राहिली तर देश गुलामगिरीत जाईल. त्यामुळे वेळीच राज्याची एकता व अखंडता टिकून ठेवण्यासाठी गांधीजींच्या विचारांचे पृथक्करण करून शासन-प्रशासन व समाज पातळीवर त्यांच्या ग्रामपुनर्निर्माण कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे अत्यंत आवश्यक आहे.

**संदर्भः-**


१. सोर वासंती, एकविसाव्या शतकात गांधी, परंधाम प्रकाशन पवनार, वर्धा, मार्च २०१०, पृ.क्र.२१-२२.
२. गोखले द. न., गांधीजी : मानव नि माहामानव, मौज प्रकाशन गृह, मुंबई, १९९६, पृ.क्र.२०९.
३. गांधी एम. के., 'हिंद स्वराज्य', साकेत प्रकाशन, पुणे, २०११, पृ.क्र.९६-९८.
४. गांधी महात्मा, ग्रामस्वराज्य, नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद, १९६३, पृ.क्र.१७९-१८१.
५. गांधीजी, मेरे सपनो का भारत, नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद, पृ.क्र.२३६.
६. गांधी महात्मा, माझ्या स्वप्नांचा भारत, परंधाम प्रकाशन पवनार, वर्धा, २०१०, पृ.क्र.६०.
७. पंडित नलिनी, गांधी, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, २००६, पृ.क्र.२४३.
८. भावे विनोबा, ग्राम स्वराज्य परंधाम प्रकाशन पवनार, वर्धा, मे २०११, पृ.क्र.५-६.